# राणा प्रताप
# यांचा
# पोवाडा —— : ८ :

संकटांचे कडे खडे तरी हिम्मत ज्याची सदा लढे। प्रतापसिंहा! नांव ऐकुनी पत्थरही होतील खडे ॥ जी ॥ राजपुतांची कीर्ती मोठी, पिउनी होउनि धुंद लढे। दऱ्याखोऱ्यांतुन पर्वत अजुनी गाति यशाचे पोवाडे ॥ ध्रु. ॥

• •

## चौक १ ला

अकबराची सत्ता दृढ झाली चारी बाजूला ॥ राजपूत मोठमोठे राजे शरण गेले त्याला ॥ मारवाड, बिकानेर, अंबर बुंदिचे राजे झाले वश त्याला ॥ भाऊ प्रतापसिंहाचा शक्तसिंहही गेला सोडून भावाला ॥ जी ॥ अन् अकबराचा मानकरी झाला ॥ पण प्रतापसिंह कधिं मान लववेना त्याला ॥ जी ॥ रानावनांत, डोंगर कपाऱ्यांत जाऊन राहिला ॥ पण तो सिंह शरण नाहीं गेला। अन् तिथनं सतावतो अकबराला। तंवा वश करायला त्याला। अकबरानं लाळूच दाखविली पण उपयोग कांहीं नाहीं झाला। तंवा त्याचा मोड करण्याला। बादशहा तय्यार झाला। अंबरचा राजा मानसिंह स्वाभिमान विसरून गेला। त्यानं बहीण दिली अकबराला। रजपूत-कुलाला कलंक त्यानं लावला ॥ जी ॥ एकदां काय प्रकार झाला। मानसिंग चालला होता दिल्लीला। तंवा वाटेंत



प्रतापसिंहाला। त्यानं असा निरोप धाडला। कीं "भेटायची इच्छा तुम्हांला"। तंवा **प्रताप** होता **कमळमेरला**। तिथून मानसिंगाला आणायला। उदयसागरपर्यंत सामोरा गेला। तिथं बैठक तयार केली भेटीला। अन् मेजवानीचा थाट मोठा केला। अन् बोलवलं मानसिंगाला। तिथं आल्यावर मानसिंग पाहतो तों राणा **प्रताप** दिसेना कुठं त्याला। **अमरसिंह** प्रतापाचा मुलगा होता दिमतीला। मानसिंग त्याला बोलला। "राणाजी आहेत कुठं बाळा"। तंवा अमरसिंह बोलूं लागला। "राणाजींचं डोकं दुखतंय म्हणून पाठवलंय त्यांनीं हो मला"। तंवा मानसिंग बोलला। "न यायचं कारण समजलं मला। जा! सांग जा, (तुझ्या बापाला) राणाजीला। तुम्हीं आलात तरच खाणंपिणं या जागेला"। तंवा राणाजी संतापून आला। अन् बोलला मानसिंगाला। "मानसिंग, थोर तुम्ही झाला। पण कलंक लावलात रजपूत कुळाला। आपल्या पोरीबाळी दिल्यात म्लेंच्छाला। अन् कुळशील-भ्रष्ट तुम्ही झाला। अशा तुमच्याबरोबर जेवण तर सोडाच। पण तुमचं नुसतं तोंडदेखील बघायला। हा राणा-सिसोदिया-तय्यार नाहीं या वेळा"॥ चाल ॥ हे असे बोल ऐकून! मानसिंग भडके रागानं ॥ जी ॥ खाणंपिणं तसंच टाकून। मानसिंग उठला रागानं ॥ जी ॥ जातां बोलला त्या वेळा। "अरे जा रे कुत्र्या! तुझा सूड घेईन तरच नांवचा **मानसिंग** झाला"। असं बोलून **मानसिंग** पार निघुनिया गेला ॥ जी ॥ १ ॥

• •

## चौक २ रा

राणाजीनं मानसिंहाचा केला अपमान। अकबर त्याचा मेहुणा झाला बेभान। अगणीत फौज वेगानं तयार करून। प्रतापाचा नाश करण्याला। अरवली पहाडांत आला। अकबरचा मुलगा सेलीम मोठ्या

झडपेनं ॥ चाल ॥ अरवली पहाडांत प्रतापसिंह तयार। जागजागीं ठेविले प्राण देणारे वीर॥ घोड्यांच्या टापांचे नाद भरले चौफेर॥ जी॥ (चाल)॥ घनघोर संग्राम झाला। रणयज्ञ असा कधिं कुणी नाहीं पाहिला!॥ जी॥ चाल॥ चेतक-घोड्यावरती बसुनी **प्रताप** फिरतो चोहीकडे। बाण लावुनी सोडत केव्हां न कळे शत्रू खालीं पडे॥ रणचंडीला नरशीर्षांचे नारळ वाहती वीर बडे। सूर्यासम तो प्रताप दिसला ठार जाहले शत्रु किडे! ॥ जी॥ (चाल)॥ लढाईचा मध्यकाळ आला। तंवा राणा फिरतो गरगरा। मानसिंग कुठाय बघण्याला। राणा गरुडासारखा चालला। पण त्याला सेलीम दिसला। तो होता अंबारींत बसला। प्रतापानं टांच मारली आपल्या घोड्याला। तो चेतक हत्तीवर थेट चालुन गेला॥ जी॥ दोन पाय लावले सोंडेला। अन् सामोरा उभा राहिला। प्रतापानं भाला फेंकला। तो हौद्याला धाडून लागला। पण त्यानं माहूत ठार केला। अन् सेलीम थोडक्यांत वांचला। पण हत्ती बेफाम झाला। अन् लागला उधळून पळायला। राणा प्रताप गेला पाठलागाला। तंवा शत्रूंनीं घेरलं प्रतापाला। आतां शत्रु मारणार त्याला। इतक्यांत **झालापति मन्ना** धांवुन आला॥ त्यानं राणाजीचा पोषाख केला। अन् राणाजीला आपला पोषाख दिला। तंवा राणाजी वायुवेगानं निघुनिया गेला!॥ **झालापति मन्ना** लढतांना मरुनिया पडला॥ असा मित्र कधीं कुणी कुणी पाहिला बोला॥ २॥

• •

## चौक ३ रा

तंवा राणाजीच्या पाटलागाला। एक **मुलतानी** अन् दुसरा **खुरासानी** शिपाई मागं लागला। इतक्यांत **शक्तसिंग** भाऊ धांवून



आला। शक्तसिंग प्रतापाचा भाऊ – पण भांडून होता निघून गेला!। शत्रूला मदत करायला। पण ऐनवेळीं तोच आला मदतीला। त्यांनीं मारलं त्या दोन्ही शिपायाला। अन् प्रतापाचा जीव बचावला। असं बंधुप्रेम पाहून – हळदीघाट धन्य धन्य झाला॥ जी॥ राणा प्रताप पंचवीस वर्षे झुंजत राहिला। पण शत्रु बळावत गेला। डोंगरातनं दऱ्याखोऱ्यातनं राणा राहिला। पण स्वाभिमान नाहिं सोडला। कंद मुळं फळं खाऊन काळ कंठला। पण मान नाहीं लवविली त्यानं यवनाला॥ जी॥ असा राणा मानी मानाचा कुणि न पाहिला॥ जी॥ **पांडुरंग** राणाजीला करतो मानाचा मुजरा!॥ ३॥

रचना–१२ जुलै १९९१, मुंबई.